दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.२३ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६० | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 23 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 260 | Pages 4 | Rate 4 Rs

### महाराष्ट्रात अभियांत्रिकी प्रवेश वेळेतच होणार

**मुंबई**–नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून ३ मे रोजी घेण्यात आलेली 'नीट-यूजी' परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द होऊन आता ती २१ जून रोजी नव्याने घेतली जाणार आहे. या परीक्षेला झालेल्या विलंबामुळे महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेशांवरही परिणाम होईल अशी चर्चा सुरू झाली होती. परंतु राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने या चर्चांना पूर्णविराम देत, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळेतच पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट केले असून, विद्यार्थी आणि पालकांनी याबाबत मनात कोणताही संभ्रम बाळगू नये, असे आवाहन केले आहे.राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'नीट' परीक्षा रद्द झाल्याचा फटका अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला बसणार असल्याचे वक्तव्य केल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला होता. याशिवाय, नीटच्या पुनर्परीक्षेमुळे या प्रवेश प्रक्रियेला विलंब होणार असल्याचे वृत्तही प्रकाशित झाले होते.

# आता गावकऱ्यांना मिळणार मोफत मिळकत पत्रिका

## सनद फी माफ करण्याची महसूलमंत्र्यांची घोषणा,ग्रामविकास विभाग तयार करणार प्रस्ताव

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत नमुना ८ दुरुस्त केल्यानंतर गावकऱ्यांना स्वामित्व योजनेतून मोफत मिळकत पत्रिका देण्यासह सनद फी माफ करण्याची असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केली. याबाबत ग्रामविकास विभागाने प्रस्ताव तयार करुन त्याची मंजूरी घ्यावी असेही ते म्हणाले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनीही या प्रकल्पाला गती देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील मालमत्तांचे वाद मिटण्यास मदत होणार असून, नागरिकांना आपल्या मालमत्तेचा कायदेशीर हक्क मिळणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने राज्यातील २३ हजार ग्रामपंचायतींच्या ३९ लाख मालमत्तांची अद्यावत उपकरणांद्वारे मोजणी केली आहे त्यामुळे मिळकत पत्रिका देण्याची प्रक्रिया जलद होऊ शकेल असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले.कोकण विभागीय आयुक्तालयात बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवर व महसूलविभागाचे अधिकारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील मालमत्तेचे मोजमाप करून, त्यांचे अचूक रेकॉर्ड तयार करणे हा स्वामित्व या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत राज्यातील ३९ लाख प्रॉपर्टींचे काम पूर्ण झाले असून, १८ हजार प्रॉपर्टी कार्डचे ऑनलाइन कामही पूर्णत्वास आले आहे. ज्या गावांचे काम पूर्ण झाले आहे, अशा गावांचे अंतिम नकाशे आणि चौकशी नोंदवही ग्रामपंचायतींना आता मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे.



### नागरिकांना मिळणार थेट फायदे

**महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, या योजने मुळे आता गावठाणच्या बाजूने २०० मीटरपर्यंतच्या मालमत्तांचे मोजमाप करून ते रहिवासी भागासाठी अधिकृत केले जाईल. यामुळे नागरिकांना त्यांच्या घरांची अधिकृत मालकी हक्काची कागदपत्रे (सनद) मोफत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच, गावस्तरावर 'नमुना ८' अद्ययावत करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती ग्रामविकास विभागाला उपलब्ध करून दिली जाणार आहे. यात धारकाचे नाव, अंतिम मिळकत भूमापन क्रमांक आणि क्षेत्रफळ यांसारख्या तपशिलांचा समावेश असेल.स्वामित्व योजनेच्या कामात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाने तत्परता दाखवावी, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.**

## पिसाळलेल्या कुत्र्याचा धुमाकूळ माळेगाव मक्ता येथे ७ जणांना घेतला चावा,दोन महिला गंभीर

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील माळेगाव मक्ता येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. गावात एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक धुमाकूळ घालत तब्बल सात जणांवर हल्ला केला. या हल्ल्यात सात जण जखमी झाले असून, दोन महिलांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.  जखमींची नावे खालीलप्रमाणे आहेत.

संगाबाई आगदराव मातेवा (वय ७५ वर्षे) – गंभीर जखमीकमलबाई रघुराम डूमणे (वय ५५ वर्षे) – गंभीर जखमीसंतोष विठ्ठल घंटेवाड (वय ४५ वर्षे)गजानन सोपान डोमगावे (वय २२ वर्षे)(यांच्यासह



अन्य तीन जण किरकोळ जखमी झाले आहेत.)

मिळालेल्या माहितीनुसार, माळेगाव मक्ता परिसरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांवर अचानक हल्ले चढवले. कुत्र्याने समोर येणाऱ्या लोकांना थेट चावा घेण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे गावात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

या हल्ल्यात वृद्ध महिला संगाबाई मातेवा आणि कमलबाई डूमणे या गंभीर जखमी झाल्या. ग्रामस्थांनी तातडीने सर्व जखमींना स्थानिक रुग्णालयात नेले. प्राथमिक उपचारानंतर, दोन महिलांची गंभीर प्रकृती पाहता सर्व रुग्णांना पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात (विष्णुपूरी) हलवण्यात आले असून, सध्या त्यांच्यावर तिथे उपचार सुरू आहेत.

गावातील भटक्या आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता माळेगाव मक्ता येथील ग्रामस्थांकडून प्रशासनाकडे केली जात आहे.

## माजलगावात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकांसाठी प्रत्येकी १ कोटी निधीची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक व परिसर सुशोभीकरणासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी धनंजय (पापा) सोळंके यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव नगरपरिषद हद्दीत आमदार प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून एस.टी. महामंडळाच्या जागेत ठराव मंजूर करून नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी १० बाय १० जागा




उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच जुने बसस्थानक परिसरात विश्वरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठीही १० बाय १० जागा निश्चित करण्यात आली आहे.

या दोन्ही स्मारकांच्या उभारणीसाठी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून फाउंडेशनसाठी निधी उपलब्ध करून दिला असून भूमिपूजनही पार पडले आहे. त्यामुळे आता स्मारकांची भव्य उभारणी व परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

धनंजय (पापा) सोळंके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये निधी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर करण्याची विनंती केली आहे. या मागणीमुळे माजलगाव शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक वैभवात भर पडणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## प्रा.अनुराधा उगले यांना रसायन शास्त्र विषयातील पीएचडी प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयातील कनिष्ठ विभागातील रसायनशास्त्र विषयाच्या अध्यापिका प्रा.डॉ. अनुराधा उगले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने रसायन शास्त्र विषयातील पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.pH metric study of complexes of some biologically active drugs with transition metal ions or lanthanides(पीएच मॅट्रिक स्टडी ऑफ कॉम्प्लेक्स ऑफ सम बायोलॉजिकली ऍक्टिव्ह ड्रग्स विथ ट्रांजेक्शन मेटल आयन्स ऑर लॅन्थानाइट्स) हा त्यांचा पीएचडी चा विषय होता. या विषयात त्यांनी सखोल अभ्यास करून एक उत्कृष्ट प्रबंध डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केला.त्यांच्या या उत्कृष्ट संशोधनाबद्दल विद्यापीठाने त्यांना आज पीएचडी पदवी प्रदान केली.यासाठी त्यांना मार्गदर्शक म्हणून लोकनेते बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथील रसायन शास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.अनिल किर्दंत यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.आजच्या झालेल्या या मौखिक परीक्षेच्या वेळी चेअरमन म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.शंकरवार सर तसेच बहिस्थ परीक्षक म्हणून शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. राशीकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रा.डॉ. अनुराधा उगले



यांच्या या यशाबद्दल कृष्णाई शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव व जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील विद्यमान प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, कोषाध्यक्ष मा.सौ.गोरे मॅडम,संस्थेच्या अध्यक्षा सौ.राजमती ताई तट, संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री. युवराज (दादा) गोरे,मा. श्री.चंद्रकांत (बाप्पा) गोरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.तसेच त्यांच्या या उत्कृष्ट संशोधनाबद्दल राजमाता जिजाऊ महाविद्यालय,किल्ले धारूर येथील प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे,योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.जाधवर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक तथा विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे नवनियुक्त अधिष्ठाता डॉ.साठे, योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ. कानिटकर सर तसेच जनविकास महा विद्यालय,बनसारोळा येथील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व अनेक आजी व माजी विद्यार्थी, सर्व नातेवाईक,मित्रमंडळी तसेच सर्व परिसरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## कोक्रोच जनता पार्टीचे सर्वेसर्वा अभिजित दिपके यांना झेड प्लस सेक्युरिटी द्या-डॉ जितीन वंजारे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

आज देशामध्ये सत्ताधारी पक्षाच्या विरोधात कोणीही बोलले असता त्याला जेलमध्ये टाकण्याची परंपराच येथील सत्ताधाऱ्यांनी चालू केलेली आहे,विरोधकांना ईडी सीबीआय आणि इतर तपास यंत्रणांचा धाक देऊन त्यांना जेलमध्ये टाकून विनाकारण त्रास दिला जात आहे. त्यांच्या भ्रष्टाचाराच्या फाईली बाहेर काढून त्यांच्यावर दबावतंत्र टाकून स्वतःच्या पक्षांमध्ये त्यांची इनकमिंग केली जात आहे. भारतीय जनता पार्टीकडे अशी कोणती वाशिंग मशीन आहे की ज्या पक्षांमध्ये भ्रष्टाचारी नेता नसताना त्याच्यावर गंभीर आरोप केले जातात आणि तोच भ्रष्टाचारी नेता सरेंडर होऊन भाजपामध्ये प्रवेश केल्यास त्याच्या सर्व भ्रष्टाचारी चौकशी यंत्रणा बंद होतात आणि तो नेता मंत्री आमदार खासदार बनतो.हे का घडत आहे याला जबाबदार कोण आहे आणि याच कारणांमध्ये आज भारतामध्ये विरोधी पक्ष कमकुवत झाला आहे. टीव्ही पत्रकार सरकार ची दलाली करत आहे. येथील टीव्ही पत्रकार केवळ विशिष्ट सत्ताधारी लोकांचे गुलाम असताना आम्ही पाहत आहोत. मीडिया विकला गेलेला आहे. नवयुवकांना जातीवाद अन धर्मवाद शिकवून आणि जातीवादाच्या नावाखाली त्यांची माथी भडकवली जात आहेत. समाजात आसमानता वाढू लागली आहे.अशातच एक जनतेच पिवर हित समोर ठेवून बोस्टन युनिव्हर्सिटी मध्ये जनसंपर्काचे धडे गीरवणाऱ्या सामान्य कुटुंबातील अभिजीत दिपके या युवकाने कॉक्रोच जनता पार्टी हा सोशल मीडियावर पक्ष स्थापन केला आहे. याला अगदी काही तासातच तीन लाखावून अधिक सबस्क्राईबर तयार झाले आणि आज तेच जवळ जवळ पंधरा मिलियनच्या घरामध्ये सबस्क्राईबर पोहोचले आहेत. म्हणजे एक सामान्य




कुटुंबात जन्मलेला मुलगा त्याच्या शिक्षणाच्या ओढीमुळे बोस्टन युनिव्हर्सिटी मध्ये जनसंपर्क या विषयांमध्ये पदवी घेतो पण स्वतःच्या देशाचं राष्ट्रहीत लक्षात घेऊन त्याने झुरळ जनता पार्टी तयार केली ती येथील सी जे आय नव तरुणांना सुशिक्षित बेकार झूराळा सारखे आहेत ते पुढे चालून माहिती अधिकार टाकून परेशान करतात अशी कथित व्हलगना केली त्यावरून.आणि त्याच नवयुवकांना हीनवलेले झूरळ ह्या शब्दावर भारतीय जनतेचा नवतरुणांचा बेरोजगारी महागाई चा रोष समोर ठेऊन कोक्रोच जनता पार्टी ची स्थापना अभिजित दिपके यांनी केली आहे. हे येथील सत्ताधारी यांना कदाचित पसंद पडणार नाही कारण काँग्रेस आणि भाजपा च्या इन्स्टा फेसबुक आणि ट्विटर एक्स अकॉउंट पेक्षा जास्त फॉलोवर अभिजित दिपके यांच्या कोक्रोच जनता पार्टी चे झाले आहेत.भारतामध्ये वाढणारी महागाई, बेरोजगार, जातीयवाद, धर्मवाद आणि इतर गोष्टींमध्ये झालेली पाहून अभिजित दिपके यांना सहन झालं नाही आणि या सत्ताधाऱ्यांना ठिकाणावर आणण्यासाठी त्याने कॉकरोच जनता पार्टी या पक्षाची स्थापना केली. परंतु मुलगा बोस्टनला आहे आई-वडील संभाजीनगर येथे आहेत त्यामुळे त्यांच्या आईवडिलांना मुलाच्या सुरक्षेची चिंता सतावत आहे. अशातच अभिजीत दिपके यांचे सर्व अकाउंट भारतामध्ये बॅन केले जात आहेत. जो माणूस देश सेवेसाठी स्वतःच्या आयुष्य समर्पण देवू पाहत आहे अशा देश भक्ती करणाऱ्या अभिजीत दीपके या युवा नेत्याला आणि कॉकरोच जनता पार्टी चा सर्वेसर्वा असल्याकारणाने व येथील जवळजवळ पंधरा मिलीयन लोकांचा सपोर्ट असणारा एकमेव सामाजिक कार्यकर्ता अभिजीत दिपके यांना भारतात आल्यावर शासनाने झेडपस प्लस सुरक्षा सुरक्षा द्यावी.अभिजित दिपके यांना थ्रेट कॉल येत आहेत, त्यांना मारण्याच्या धमक्या येत आहेत,जर सुरक्षा प्रदान केले नाही तर त्यांच्या जीवास धोका उद्भवू शकतो काही लोक कुटील कारस्थान करू शकतात किंवा दबाव तंत्र वापरून सरकार अटक ही करू शकते आणि म्हणून ज्याप्रमाणे आर एस एस च्या मोहन भागवत यांना झेड प्लस सुरक्षा पुरवलेली आहे अगदी तशीच झेड प्लस सुरक्षा युवकांचे हृदय स्थान असणारे अभिजीत दिपके याला द्यावी असे आव्हान त्यांचे मेव्हणे सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी येथील सरकारी यंत्रणेला प्रसिद्धीपत्रकाद्वारे निवेदन देऊन केली आहे.

# संपादकीय

## चिंताजनक ‘हवा’

पश्चिम आशियातील युद्धाचे ढग पुरते विरळ झालेले नसताना आणि त्यामुळे इंधन संकटापासून अर्थव्यवस्थेपर्यंत त्याचा फटका सहन करावा लागत असताना; तसेच देशातील बहुतांश भाग चाळीस अंश तापमानाने भाजून निघत असताना, यंदा मान्सून केरळ किनारपट्टीवर तुलनेने लवकर (म्हणजे एक जूनच्या ऐवजी २६ मे रोजी) थडकणार, ही बातमी खरे तर दिलासादायक ठरायला हवी. मात्र, त्याच वेळी मान्सूनवर विपरीत परिणाम करणारा ‘एल निनो’नामक घटकही आधीच्या अंदाजापेक्षा लवकर सक्रिय होणार असल्याने दिलासा वाटण्याऐवजी चिंता वाढली आहे.जून ते सप्टेंबर दरम्यान हमखास पडणारा मोसमी पाऊस म्हणजेच मान्सून हे भारताचे ठळक वैशिष्ट्य. आजही देशाची अर्थव्यवस्था मोठ्या अंशी मान्सूनवरच अवलंबून आहे. सागरी पृष्ठभागाचे तापमान, तेथील दाब, वारा आदी विविध घटकांवर असलेला पाऊस हवामानाप्रमाणेच लहरी. त्यामुळे तो कधी जोरात बरसतो, तर कधी पाठ फिरवतो. तो जोरात झाल्यास शेतात आणि बाजारपेठेत चैतन्य निर्माण होते; अन् पुरेसा न झाल्यास तोंडचे पाणी पळते.यंदाच्या मान्सूनवर सावट आहे, ते ‘एल निनो’चे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्यामुळे हा घटक सक्रिय होतो आणि त्यामुळे दक्षिण अमेरिकेत अतिवृष्टीची, तर भारतात अवर्षणाची शक्यता निर्माण होते. या वर्षी ‘एल निनो’ सक्रिय होणार याची कल्पना असल्याने हवामान विभागाने आधीच ‘दीर्घकालीन सरासरी’पेक्षा कमी म्हणजे ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. हा ‘एल निनो’ जूनमध्येच सक्रिय होणार असल्याने आणि प्रशांत महासागराचा पृष्ठभाग दोन अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक तापण्याची भीती असल्याने अवर्षणाची शक्यता आणखी वाढली आहे. त्यामुळे यंदाचा पावसाळा चिंताजनक आणि आव्हानात्मक असू शकतो.विषुवृत्तीय प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने अधिक असल्याकडे हवामान शास्त्रज्ञ लक्ष वेधत आहेत. हे वाढीव तापमान म्हणजे ‘एल निनो’ अपेक्षेहून अधिक लवकर सक्रिय होण्याचे लक्षण. आधीच्या वर्षातील तापमान कमी होण्याचे आणि ते परत वाढण्याचे चक्र यंदा अधिक वेगाने फिरत असून, ही असामान्य घटना असल्याचे मानले जाते. याचा अर्थ ‘एल निनो’ अधिक तीव्र असणार. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान १.५ अंश सेल्सिअसहून अधिक झाल्यास ‘एल निनो’ तीव्र झाला, असे मानले जाते. त्या स्थितीस ‘सुपर एल निनो’ही म्हणतात.ही घटना प्रशांत महासागरातील असली, तरी तिचे हवामानशास्त्रीय परिणाम साऱ्या जगावर होतात. यामुळे दक्षिण अमेरिकी देशांत अतिवृष्टी होऊन पूर येण्याची, त्यात पिके वाहण्याची आणि मानवी संकट गडद होण्याची भीती असते; तर भारतात मोसमी पाऊस कमी होतो, अनेक ठिकाणी तो बरसतच नाही, तापमान वाढते; त्यामुळे पाण्याच्या दुर्भिक्ष्याची, पिके न येण्याची आणि महागाईची शक्यता अधिक असते. या शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना आखण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे आपत्कालीन उपायांबद्दल भरभरून बोलले जात असले आणि कागदावर योजना आखल्या गेल्या असल्या, तरी प्रत्यक्षात त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर ‘एल निनो’मुळे येऊ घातलेल्या संकटाकडे पाहावे लागेल.दहा वर्षांपूर्वी म्हणजे २०१५-१६ या काळात ‘एल निनो’चा प्रभाव होता आणि त्यामुळे एकूण सरासरीच्या ८६ टक्केच पाऊस झाला होता. त्या वेळी महाराष्ट्रात, विशेषत: मराठवाड्यात खूपच कमी पाऊस झाला होता. पाण्याचे मोठे संकट निर्माण झाले होते. त्या वेळी लातूरला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती. २०२३मध्येही ‘एल निनो’ होता; त्या वेळी ऑगस्ट महिन्यातील पावसावर मोठा परिणाम झाला होता. त्या महिन्यात ३६ टक्के पाऊस कमी झाला होता. हा अनुभव लक्षात घेऊन धोरणकर्त्यांना उपाय योजावे लागतील.

प्रशांत महासागराप्रमाणेच हिंदी महासागराच्या तापमानाचाही मान्सूनवर परिणाम होत असतो. हिंदी महासागराच्या पश्चिमेकडील पृष्ठभाग अधिक तापल्यास ‘इंडियन ओशिएन डायपोल’ नावाचा घटक तयार होतो आणि तो मान्सूनला पूरक असतो, असे मानले जाते. यंदा हा घटकही सक्रिय असण्याची शक्यता असल्याने थोडीफार आशादायक स्थिती आहे; परंतु प्रतिकूलतेची शक्यता गृहीत धरून, येणाऱ्या कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी पावले उचलायला हवीत.

# प्रबोध डावखरेंच्या हाती राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या हस्ते झाला प्रवेश

## ठाण्यात राष्ट्रवादीला पूर्वीचे वर्चस्व मिळवून देणार-प्रबोध डावखरे

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

कै. वसंत डावखरे यांचे चिरंजीव प्रबोध डावखरे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.कै. वसंत डावखरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीसाठी मेहनत घेतली होती. अनेक वर्षे ते विधानपरिषदेचे सभापती होते. अजातशत्रू म्हणून त्यांची ओळख होती असे सांगतानाच शिव - शाहू - फुले - आंबेडकर या महामानवांच्या विचारांवर काम करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये त्यांचे चिरंजीव प्रबोध डावखरे यांनी प्रवेश केला आहे. प्रबोध डावखरे यांना पक्षात चांगली वागणूक मिळेल. त्याचबरोबर तुमच्यापाठीमागे संपूर्ण पक्ष



भक्कमपणे उभा असेल असा शब्द छगन भुजबळ यांनी यावेळी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहिलेले कै. वसंत डावखरे यांचे चिरंजीव प्रबोध डावखरे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते खासदार पार्थ पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत प्रवेश केला. यावेळी प्रमोद डावखरे यांनी वडिलांच्या वेळी ठाण्यात राष्ट्रवादीचे जसे वर्चस्व होते ते वर्चस्व पुन्हा आणण्याचा निर्धार पक्षप्रवेश झाल्यावर माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

यावेळी प्रबोध डावखरे यांचे पक्षात दिलीप वळसे - पाटील यांनी स्वागत केले. प्रमोद डावखरे हे पक्ष संघटना निश्चितच मजबूत करतील असा विश्वासही दिलीप वळसे - पाटील यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री दिलीप वळसे - पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार प्रतापराव चिखलीकर - पाटील, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, युवक नेते व प्रदेश प्रवक्ते सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदी उपस्थित होते.

# महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मुंबई भाजपा महिला मोर्चाच्या वतीने पोलीस आयुक्त श्री.देवेन भारती यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

मुंबई शहरातील वाढते महिलांवरील अत्याचार, बलात्काराच्या घटना, अंमली पदार्थांचे वाढते प्रमाण, सोशल मीडियावरील गैरवर्तन तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजनांबाबत सविस्तर निवेदन मुंबई भाजपा महिला मोर्चाच्या वतीने पोलीस आयुक्त देवेन भारती यांना सादर करण्यात आले.महिला मोर्चाच्या वतीने संवेदनशील भागांमध्ये विशेष पोलीस पथक, ड्रग्सविरोधी विशेष मोहीम, पोलीस ताई माझी आई उपक्रम, डिलिव्हरी ॲप कर्मचाऱ्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन तसेच सोशल मीडियावरील अश्लील भाषा व धमक्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी



करण्यात आली.या शिष्टमंडळात महिला मोर्चा मुंबई अध्यक्षा योजना ठोकळे यांच्यासह महामंत्री अंकिता चौधरी सावे, राजवी नाईक, सारिका पवार, आरती निजापकर, श्रद्धा सुर्वे व ज्योती दुराफे, पायल शहा उपस्थित होत्या.मुंबई शहर महिलांसाठी अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि सुसंस्कृत बनविण्यासाठी पोलीस प्रशासन सकारात्मक पावले उचलेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



**ठाणे : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक २९ मधील देसाई, खिडकाळी येथे पाण्याच्या टाकी परिसरातील नगरसेविका अर्चना निलेश पाटील व नगरसेवक बाबाजी पाटील यांच्या मागणीनुसार पाण्याच्या टाकीच्या जागेला पूर्ण वॉल कंपाऊंड, कर्मचारी व वॉलमेंटसाठी रेस्ट रूम, बाथरूम तसेच लाईन व वॉल जोडणीसाठी चेंबर करण्यासाठी भूमिपूजन करण्यात आले. सदरचे काम तीन महिन्यांत पूर्ण झाल्यानंतर पाण्याच्या टाकीची सुरक्षा अधिक मजबूत होईल तसेच सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही. तसेच पावसाळापूर्व नालेसफाई कामांचा पाहणी दौरा करण्यात आला. ग्रीन पार्क, शिबली नगर, भोलेनाथ नगर, दोस्ती परिसर, शीळफाटा आणि कल्याण फाटा येथील नाल्यांची पाहणी करण्यात आली. प्रसंगी ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी संजय जाधव, सुरेश वाघीरे, वायदंडे तसेच स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.**

# बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीविरोधात औषध विक्रेत्यांची आझाद मैदानात निर्दशने

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कॉर्पोरेट कंपन्यांकडून निर्माण करण्यात येणाऱ्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात आज २० मे रोजी आझाद मैदानावर काळया फित लावून जोरदार निदर्शने केली.या बंदला महाराष्ट्रातही मोठा प्रतिसाद मिळाला असून १२ लाख ५० हजार औषध विक्रेते या बंद मध्ये सहभागी झाल्याचा दावा द महाराष्ट्र स्टेट केमिस्टस् ॲन्ड ड्रगिस्टस् असोसिएशनने केला आहे.संघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी सांगितले की, औषध व्यवसाय हा Drugs and Cosmetics act 1940 व Rule 1945 अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र, ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे. केंद्र सरकारने २०१८ मध्ये GSR 817(E) अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले असले तरी त्याचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीवर स्थगितीही दिली असल्याचा दावा त्यांनी केला.

कोरोना काळात औषधांची होम डिलिव्हरी करण्यासाठी सरकारने ऋछठ २२०(ए) अंतर्गत तात्पुरती सवलत दिली होती. मात्र, कोरोना संपल्यानंतरही ही अधिसूचना मागे घेण्यात आलेली नसल्याने ऑनलाईन कंपन्या त्याचा गैरफायदा घेत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. त्यामुळे छोट्या औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात येत असून ग्रामीण भागातील औषध वितरण



व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.Drug Price Control Order (DPCO) २०१३ अंतर्गत नियंत्रित नफ्याची मर्यादा असताना कॉर्पोरेट कंपन्या २० ते ५० टक्क्यांपर्यंत सवलत देत असल्यामुळे देशातील सुमारे १२.५० लाख औषध विक्रेत्यांवर व्यवसाय बंद करण्याची वेळ येत असल्याचे नावंदर यांनी सांगितले. तसेच डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांच्या पर्यायी ब्रँडची विक्री करण्याचा अधिकार औषध विक्रेत्यांना देण्याची मागणीही त्यांनी केली.सरकारकडे वारंवार निवेदने देऊन तसेच संबंधित मंत्र्यांची भेट घेण्याचा प्रयत्न करूनही कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागल्याचे नावंदर यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही निवेदन देण्यात आले होते, मात्र त्यालाही प्रतिसाद मिळाला नसल्याचे त्यांनी सांगितले.सरकारने समस्यांवर सकारात्मक भूमिका घेतली नाही तर आंदोलनाचा पुढील टप्पा जाहीर करण्यात येईल आणि त्यामुळे जनतेला होणाऱ्या गैरसोयीस सरकार जबाबदार राहील, असा इशाराही संघटनेकडून देण्यात आला.

# कुरैश अन निकाह मिन सुन्नतीच्या जालना जिल्हा अध्यक्ष पदी असलम कुरेशी

दैनिक वादळ वार्ता । जालना । असलम कुरेशी




कुरैश अन निकाह मिन सुन्नती या सामाजिक संघटनेच्या जालना जिल्हा अध्यक्ष पदी पत्रकार असलम कुरेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी अन्वर कुरेशी (दिल्ली) यांनी असलम कुरेशी यांची नियुक्ती केली.कुरेशी समाजात साध्या पध्दतीने विवाह करण्याच्या उद्देशाने समाजात जनजागृती करण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल असलम कुरेशी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# समर्थ सहकारी बँकेच्या चेअरमन पदी वरखडे

दैनिक वादळ वार्ता । जालना । असलम कुरेशी

समर्थ सहकारी बँकेच्या चेअरमन पदी रांजणीचे माजी सरपंच व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) चे जेष्ठ नेते आबासाहेब भाऊ वरखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



आबासाहेब भाऊ वरखडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व माजी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेशभैय्या टोपे यांचे कट्टर समर्थक आहेत. या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणूकीत लाभ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या नियुक्तीबद्दल आबासाहेब भाऊ वरखडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून रविवार २४ मे रोजी सकाळी १० वाजता त्यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे.

# हाऊस ऑफ स्वामीराजच्या प्रकल्पविस्तारात वाढ

## कोपरी येथे २८० कोटी रुपयांच्या नव्या आलिशान पुनर्विकास प्रकल्पाची भर

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

हाऊस ऑफ स्वामीराज ने ठाण्यातील उदयोन्मुख रिअल इस्टेट क्षेत्रातील आपले अस्तित्व अधिक भक्कम करत, ठाणे (पूर्व) येथील कोपरी परिसरात आणखी एका महत्त्वपूर्ण पुनर्विकास प्रकल्पावर स्वाक्षरी केल्याची घोषणा केली आहे. सुमारे २८० कोटी रुपये मूल्य असलेला हा प्रकल्प उच्च क्षमता असलेल्या या परिसरात आलिशान नागरी विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.मुंबई हे देशातील सर्वाधिक निवासी व्यवहार असलेले बाजारपेठीय केंद्र म्हणून आपले स्थान कायम राखत असताना, या नव्या प्रकल्पाची घोषणा मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वेगाने वाढणाऱ्या रिअल इस्टेट क्षेत्राशी सुसंगत मानली जात आहे. नुकताच करारबद्ध झालेला हा प्रकल्प उच्च दर्जाच्या निवासी आणि व्यावसायिक संकुलाच्या स्वरूपात विकसित करण्यात येणार असून, त्यामध्ये सुयोग्य नियोजन असलेली २ आणि ३ बीएचके घरे तसेच दर्जेदार व्यावसायिक जागांचा समावेश असेल. आधुनिक जीवनशैलीला साजेशा तसेच उत्तम संपर्क सुविधा आणि गुणवत्तापूर्ण जागांचा शोध घेणाऱ्या गृहखरेदीदार व व्यावसायिकांच्या गरजा लक्षात घेऊन हा प्रकल्प उभारला जाणार आहे.




या प्रकल्पाबाबत बोलताना जेसन सॅम्युएल, व्यवस्थापकीय संचालक, हाऊस ऑफ स्वामीराज म्हणाले, ठाणे (पूर्व) येथील कोपरी परिसराला धोरणात्मक स्थान आणि उत्तम संपर्क सुविधांमुळे मोठी विकासक्षमता लाभली आहे. आधुनिक रचना, उपयुक्तता आणि रहिवासी तसेच व्यावसायिकांसाठी दीर्घकालीन मूल्य यांचा समतोल साधणाऱ्या जागा निर्माण करण्यावर आमचा भर आहे. गुणवत्तापूर्ण पुनर्विकासाच्या माध्यमातून नागरी परिसराचे स्वरूप नव्याने घडवण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे हे प्रकल्प प्रतीक आहे.याशिवाय, कोपरी परिसराचे धोरणात्मक स्थान आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांशी असलेली जवळीक यामुळे हा भाग दीर्घकाळापासून विकासासाठी आशादायी मानला जात आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत येथे मोठ्या प्रमाणावर आणि उच्च दर्जाचे प्रकल्प मर्यादित प्रमाणातच उभे राहिले आहेत. ही उणीव ओळखून हाऊस ऑफ स्वामीराज ने आलिशान सुविधा, सोयीसुविधा आणि आधुनिक रचनेचा संगम घडवत या परिसराची खरी क्षमता विकसित करण्यावर भर दिला आहे.

या दृष्टीकोनाला पुढे नेत, या प्रकल्पात उच्च दर्जाची रचना, जागेचे प्रभावी नियोजन तसेच निवासी आणि व्यावसायिक वातावरणाचा सुरळीत समन्वय यावर विशेष भर दिला जाणार आहे. प्रस्थापित परिसरांमध्ये जीवनशैली अधिक उंचावणारे आणि व्यावसायिक संधींना चालना देणारे भविष्याभिमुख प्रकल्प उभारण्याच्या कंपनीच्या भूमिकेचे हे प्रतिबिंब मानले जात आहे. हा टप्पा हाऊस ऑफ स्वामीराज च्या मुंबई महानगर प्रदेशातील पुनर्विकास प्रकल्पांच्या विस्तारात आणखी भर घालणारा ठरला असून, कमी विकसित पण उत्तम संपर्क सुविधा असलेल्या परिसरांचे नियोजनबद्ध आणि उच्च दर्जाच्या विकासाच्या माध्यमातून पुनरुज्जीवन करण्याच्या कंपनीच्या सातत्यपूर्ण भूमिकेवर त्यातून अधोरेखित होत आहे.दर्जेदार बांधकाम, नाविन्यपूर्ण संकल्पना आणि ग्राहककेंद्री दृष्टिकोन यांवर सातत्याने भर देत, हाऊस ऑफ स्वामीराज कंपनी प्रदेशातील विकसित होत असलेल्या रिअल इस्टेट क्षेत्राला नवे स्वरूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

# बीड,लातूर,धाराशिव स्थानिक स्वराज्यसंस्था मतदार संघातून रमेश आडसकर यांना उमेदवारी द्यावी–राजेश सोळंके

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून मधला काही काळ वगळला तर रमेश आडसकर यांनी अजित दादा यांच्या म्हणण्यावर लोकसभा विधानसभेच्या निवडणुका लढवल्या माजलगाव तालुक्याचे राजकारण पाहता मधल्या काळामध्ये रमेश आडसकर साहेब यांनी एक विधानसभा भाजपाकडून तर एक विधानसभा अपक्ष लढून माजलगाव तालुक्यातील जनतेची साथ सिद्ध केलेली आहे रमेश आडसकर साहेब हे पूर्वीपासून अजित दादा पवार यांचे खंदे समर्थक होते मात्र काही काळ त्यांनी जनतेच्या विकासाची आस मनात ठेऊन सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला मात्र उद्देश साध्य झाला नाही आणि अडसकर यांनी राष्ट्रवादी अजित दादा यांचे नेतृत्व स्वीकारले रमेश आडसकर यांनी अजित दादा यांचे नेतृत्व स्वीकारून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून अजित दादा पवार यांना भावाप्रमाणे साथ देण्याचा प्रयत्न केला आहे एकेकाळी हाबाडा

फेम म्हणून ओळखले जाणारे बाबुरावजी आडसकर यांनी काँग्रेस पक्षात असताना माजी मंत्री तथा माजी आमदार बापूसाहेब काळदाते यांना पराजित करून नावलौकिक मिळवला होता तेव्हापासून बाबुरावजी आडसकरांसह आडसकर घराणा हाबाडा फेम म्हणून ओळखला जाऊ लागला आहे बाबुराव आडसकर यांना मानणारा बीड जिल्ह्यात मोठा वर्ग आहे त्या वर्गाची नाळ न तुटू देता रमेश आडसकर आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करत आहेत गोरगरीब, दिन दुबळा, दलित, कामगार, शेतकरी यांना डोळ्यासमोर ठेवून काम करण्याचा प्रयत्न करतात पक्ष कोणताही असो रमेश आडसकर यांचे प्रस्थ वेगळेच आहे आणि ते सिद्ध झालेले आहे त्यामुळेच अजित दादा पवार यांनी रमेश आडसकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश देऊन हसतमुखाने स्वागत केल्याचे दिसून येत आहे रमेश आडसकर म्हणजे सर्वसामान्य गरिबीच नेतृत्व म्हणून ओळखले जातात मात्र अजित दादा पवार यांच्या अकाली मृत्यू मुळे हवालदिल पाहायला मिळत आहेत अजित दादा पवार असते तर रमेश आडसकर बीड लातूर धाराशिव विधान परिषदेचे उमेदवार म्हणून घोषित झाले असते मात्र अजित दादा पवार यांच्या अकाली निधनामुळे रमेश आडसकर यांचे आमदार होण्याचे स्वप्न पक्षाच्या प्रमुख महाराष्ट्राच्या लाडक्या नेत्या सुनित्रा ताई पवार याच्या हातात असून त्या निश्चित च उमेदवारी देऊन साकार करतील अशी अपेक्षा बीड लातूर धाराशिव येथील स्थानिक स्वराज्य संस्थेचे मतदार व्यक्त करत आहे त्यामुळे बीड लातूर धाराशिव या स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून सर्वांचे आवडते आणि लोकप्रिय नेते रमेश रावजी आडसकर साहेब यांना बीड लातूर धाराशिव या स्थानिकस्वराज्य मतदार संघातून उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी तरुण तडफदार युवा उद्योजक राघव ज्वेलर्सचे मालक राजेश सोळंके यांनी व्यक्त केली आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि सुनेत्रा ताई अजित दादा पवार यांच्याकडून जनतेतील लोकप्रिय सर्वसाधारण जनतेचे तारणहार रमेश रावजी आडसकर साहेब यांना उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा राजेश सोळंके व्यक्त केली आहे.



## नांदेड मध्ये लाखांचे 'ब्राऊन शुगर' जप्त

# ४ लाख ७० हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### ०४ जणांना ताब्यात घेण्यात आले

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत ७२.०३ ग्रॅम ब्राऊन शुगर (चिट्टा) व एक स्कुटी असा एकूण ४ लाख ७० हजार २७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध वजीराबाद पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आणि अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात



आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती की, अमृतसर (पंजाब) येथून काही जण नांदेडमध्ये अमली पदार्थ विक्रीसाठी येणार आहेत. त्यानुसार २० मे रोजी नांदेड–हिंगोली गेट परिसरात सापळा रचून पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता ७२.०३ ग्रॅम वजनाची ब्राऊन शुगर, एक स्कुटी आणि नोटा मोजण्याचे मशीन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.ताब्यात घेण्यात आलेल्यांमध्ये राजविंदर कौर जर्मनजितसिंग महाल (रा. अमृतसर, पंजाब), गुरमुखसिंग उर्फ गुरी सेवकसिंग गिल (रा. गुरुद्वारा गेट नं. ६, शाहिदपुरा, नांदेड), अमनप्रितसिंग उर्फ मनी जगजीतसिंग बेदी (रा. गुरुद्वारा गेट नं. २, नांदेड) आणि जगजीत उर्फ पटेल गोविंदराव सोनटक्के (रा. बाबानगरवाडी, ता. जि. नांदेड) यांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये ३ लाख ६० हजार १५० रुपयांची ब्राऊन शुगर, १ लाख १० हजार रुपयांची स्कुटी तसेच नोटा मोजण्याचे मशीन यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वजीराबाद पोलीस करीत आहेत.

## श्रेष्ठा परीक्षेत प्रतीक दाभाडेची चमकदार कामगिरी!

### आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूलमध्ये निवड

### आदर्श विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा





दैनिक वादळ वार्ता
**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

येथील आदर्श मराठी प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यामंदिराच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावरील श्रेष्ठा (National Testing -gency) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या लौकिकात भर घातली आहे. इयत्ता आठवीतील विद्यार्थी प्रतीक गजानन दाभाडे याची आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल, कोकमठाण, जि. अहमदनगर येथे निवड झाली असून परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.शैक्षणिक गुणवत्तेसाठी ओळख असलेल्या आदर्श विद्यालयातील प्रतीकने सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या प्रेरणेच्या जोरावर हे यश मिळविले. राष्ट्रीय पातळीवरील या परीक्षेत मिळालेल्या यशामुळे विद्यार्थ्यांसह शाळेच्या शिक्षकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रतीकच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ, चिखलीचे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे व सचिव प्रेमराजजी भाला यांनी विशेष अभिनंदन केले. तसेच स्थानिक सल्लागार मंडळाचे छगनदादा मेहेत्रे, अनंतराव खेकाळे, शिवप्रसादभाऊ ठाकरे, दिलीपभाऊ काळे, काशिनाथराव भालेराव, तुळशीदासभाऊ चौधरी आणि सुनीलभाऊ शीलवंत यांनी विद्यार्थ्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष मोरे सर यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी शिक्षक सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तसेच संजय भुतेकर सर, दाभाडे सर, मेहेत्रे सर, मापारी सर, भुतेकर सर, दांडगे सर, गोरे मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रतीकचा सत्कार करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.प्रतीक दाभाडेच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील राष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, असा विश्वास पालक व नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे

# नांदेडमध्ये बोगस बियाणे व खत विक्री विरोधात छावा मराठा युवा महासंघ आक्रमक;जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी०**

सध्या खरीप हंगाम तोंडावर असताना नांदेड जिल्ह्यात बोगस, निकृष्ट दर्जाचे बियाणे व खतांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्या जात आहे त्यामुळे आज जिल्हाधिकारी नांदेड यांची भेट घेऊन छावा मराठा युवा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर केले आहे नांदेड जिल्ह्यात पाकीट वर कंपनीचे नाव वेगळे आणि आत मध्ये बियाणे वेगळे विक्री करून शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणात कृषी दुकानदाराकडून फसवणूक केली जात आहे असल्याचा गंभीर आरोप छावा मराठा युवा महासंघाने केला आहे. याबाबत जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना



निवेदन देत संबंधित कृषी सेवा केंद्रांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील हुंबाड व विक्रम पाटील बामणीकर उपजिल्हाप्रमुख नांदेड यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही कृषी सेवा केंद्र चालक स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी जादा दराने बियाणे व खतांची विक्री करत असून शेतकऱ्यांना पक्की बिले देखील दिली जात नाहीत. तसेच बोगस व भेसळयुक्त बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची मोठी आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच संबंधित कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करावेत अशी मागणी छावा मराठा युवा महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा छावा मराठा युवा महासंघाने दिला आहे. दिलेल्या निवेदनावर प्रदीप पाटील हुंबाड जिल्हाप्रमुख नांदेड विक्रम पाटील बामणीकर उपजिल्हाप्रमुख नांदेड श्रीकांत पाटील बस्वदे युवा जिल्हाध्यक्ष नांदेड संभाजी पाटील पवळे जिल्हा कार्याध्यक्ष नांदेड व्यंकटराव पाटील कौन्सले तालुकाप्रमुख कंधार बजरंग पाटील पाळेकर तालुकाप्रमुख मुखेड तिरुपती पाटील भागानगरे संपर्कप्रमुख नांदेड मधुकर पाटील भागानगरी यांच्यासह जिल्ह्यातील छावा मराठा युवा महासंघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते निवेदनाच्या प्रती मा. कृषी मंत्री साहेब मा. कृषी आयुक्त साहेब मा. विभागीय कृषी सहसंचालक साहेब मा. पोलीस अधीक्षक साहेब नांदेड मा. जिल्हा कृषी अधिकारी साहेब जिल्हा परिषद नांदेड यांना दिले आहेत दिलेल्या निवेदनावर वरील पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

# मांडकीत २८ लाखांचा चंदनसाठा जप्त

## पुणे ग्रामीण एटीएसची धडक कारवाई; सराईतावर गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**हवेली । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) पुरंदर तालुक्यातील मांडकी येथे छापा टाकून तब्बल २८ लाख रुपयांचा चोरीचा चंदनसाठा जप्त केला. या कारवाईमुळे चंदन तस्करीच्या वाढत्या घटनांवर पुन्हा एकदा प्रकाश पडला असून, पोलिसांनी सराईत आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

प्रतिक प्रमोद खुंटे (रा. मांडकी, पाटील वस्ती तां. पुरंदर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) सासवड व जेजुरी परिसरात अभिलेखावरील संशयितांचा शोध घेत असताना खबऱ्याकडून मांडकी (ता. पुरंदर) येथील पाटील वस्ती परिसरातील विलास भोसले यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात



चोरीच्या चंदनाचा साठा असल्याची खात्रीशीर माहिती पथकास मिळाली. त्यानुसार एटीएस पथकाने जेजुरी पोलिसांच्या मदतीने सदर ठिकाणी छापा टाकला. तेथे हिरव्या कापडाखाली लपवून ठेवलेले ५६० किलो वजनाचे चंदनाचे लाकडी ओंडके आढळून आले. यासोबतच झाडे तोडण्यासाठी वापरण्यात येणारा बॅटरीवर चालणारा कटर व दोन लोखंडी ड्रिलही जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत २८ लाख ५ हजार २०० रुपये आहे.शेतीमालक विलास भोसले यांच्याकडे चौकशी केली असता, हा चंदनसाठा त्यांचा भाचा प्रतिक याने ठेवला असल्याचे समोर आले. पोलिसांनी आरोपीचा शोध घेतला असता तो फरार असल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी प्रतिक खुंटे याच्याविरोधात जेजुरी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३(२), भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम २६, ४१, ४२ तसेच महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९८८ मधील कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रतिक खुंटे हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर सातारा जिल्ह्यात जबरी चोरीसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

### 'पुष्पा' स्टाईल चंदन तस्करीचे लोण

'पुष्पा' चित्रपटात दाखविण्यात आलेल्या पद्धतीने झाडांची तोड आणि चंदन तस्करीच्या घटना महाराष्ट्रात वाढताना दिसत आहेत. शाळा, महाविद्यालये आणि रहिवासी सोसायट्यांमधील मौल्यवान चंदन वृक्ष चोरीला जाण्याच्या घटनांमुळे सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढत्या तस्करीमुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.सदर कामगिरी पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल्ल व बारामती अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, जेजुरी पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांचे मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रविंद्र जाधव, पोलीस अंमलदार मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक, जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप यांनी केली आहे.

# महात्मा फुले २०० वी जयंती उत्सव: काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्र भर २० जाहीर सभा

## राहुलजी गांधी यांच्या उपस्थितीत नायगाव सातारा येथे सांगता सभेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या आगामी २०० व्या ऐतिहासिक जयंतीचे औचित्य साधून,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वतीने संपूर्ण राज्यभरात हा उत्सव अभूतपूर्व उत्साहात साजरा करण्याचा संकल्प प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व समितीचे अध्यक्ष भानुदास माळी यांच्या प्रमुख उपस्थित मुंबई येथे झालेल्या बैठकीत करण्यात आला आहे.या बैठकीमध्ये महात्मा फुलेंचे विचार आणि त्यांचे महान कार्य जनमानसात प्रज्वलित करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात वैचारिक प्रबोधनाचा भव्य आराखडा तयार करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय व प्रांतीय नेतृत्वाचे लाभले मार्गदर्शन**

या महत्त्वपूर्ण बैठकीत उत्सव समितीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस माननीय भानुदासजी माळी यांनी संपूर्ण महोत्सवाचे नेटके नियोजन व रूपरेषा मांडली.यावेळी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी विदर्भाचेनिरीक्षक तथा राजस्थानचे आमदार कुणालजी चौधरी,उपाध्यक्ष अड. गणेश पाटील यांनी उपस्थित राहून उत्सव समितीला अत्यंत मोलाचे व दिशादर्शक मार्गदर्शन केले.

**वर्ध्यापासून रणशिंग फुंकणार; २० जाहीर सभा व १ सांगता सभेचे आयोजन**

महात्मा फुलेंच्या विचारांचा जागर करण्या साठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय व स्थानिक नेत्यांच्या प्रमुख २० जाहीर सभांचे भव्य नियोजन करण्यात आले आहे.असून या संपूर्ण अभियानाची पहिली ठिणगी १८ जून रोजी वर्धा येथे पडणार आहे. उत्सव समितीचे अध्यक्ष भानुदासजी माळी यांच्या नेतृत्वाखाली ही पहिली जाहीर सभा मुकुल वासनिक जी,हर्षवर्धन सपकाळ साहेब,विजय वडेट्टीवारजी,नानाभाऊ पटोले आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक रित्या पार पडेल.

**केंद्रीय नेतृत्वाची साथ**

देशाचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत जी यांच्यासह




अनेक केंद्रीय नेत्यांना सोबत घेऊन हा जयंती उत्सव आणि महात्मा फुलेंचे कार्य तळागाळा तील जनतेपर्यंत पोहोचवण्याचा दृढ निश्चय या बैठकीत करण्यात आला.

**सातारा (नायगाव) येथे होणार ऐतिहासिक सांगता सभा**

या संपूर्ण अभियानाचा सुवर्णकलश क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगाव जिल्हा सातारा येथे भव्य सांगता सभेने होणार आहे.या महा सभेसाठी देशाचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते जननायक राहुलजी गांधी,ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत,मुकुल वासनिक,प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले यांच्या सह देशभरातील प्रमुख ओबीसी नेत्यांना आमंत्रित करण्याचा ऐतिहासिक निर्णय या बैठकीत एकमुखाने घेण्यात आला.


**प्रमुख पदाधिकारी व मान्यवरांची उपस्थिती**

या विचारमंथन बैठकीला महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून आलेले काँग्रेसचे प्रमुख शिलेदार आणि पदाधिकारी उपस्थित होते.यामध्ये प्रामुख्याने नंदकुमार सर्जेराव कुंभार (प्रदेश सरचिटणीस),विजय राऊत (नाशिक), कांचनकुमार चाटे (छत्रपती संभाजीनगर) राजू घुटे (बुलढाणा), वसंत मुंडे (बीड),पांडुरंग कुंभार प्रदेशसचिव (धाराशिव),शंभू म्हात्रे (पनवेल),धनराज राठोड प्रदेश सचिव (नांदेड), सुरेश पाटील खेडे (ठाणे) अशोक खलाणे (जळगाव),दिपक गायकवाड (सांगली) यांच्यासह महाराष्ट्र काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि इतर प्रमुखलोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ही बैठक अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. या भव्य आयोजनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात महात्मा फुलेंच्या विचारांचे एक नवे वादळ निर्माण होणार,असा विश्वास सर्व नेत्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे सरजुबाई मोहनलालजी शर्मा यांच्या जन्मशताब्दी निमित्त मोफत वैद्यकीय शिबीराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

ह.भ.प.समाधान महाराज शर्मा व ह.भ.प. संतोष महाराज शर्मा, कन्या सौ.शोभा सुनील दायमा यांच्या मातोश्री सरजुबाई मोहनलालजी शर्मा (सुंटवाल) केज यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे मोफत नेत्र तपासणी,मधुमेहरुग्णांची रक्त-लघवी तपासणी व सामान्य रुग्णांची मोफत तपासणी शिबीर दि.२३ मे २०२६ ते दि.१५ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.बीडजिल्ह्याचे सुपूत्र ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या मातोश्री सरजुबाई शर्मा यांनी १०१ व्या वर्षात पदार्पण केले.या निमित्ताने सकल जैन समाज बीड यांच्यावतीने मातोश्रींच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे सामाजिक वैद्यकीय उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे सुपूत्र ह.भ.प.समाधान






महाराज शर्मा यांनी आपल्या बीड जिल्ह्याचे संत-महंतांचे विचार समाजात पेरुन त्यांनी आगळी-वेगळी ओळख बीड जिल्ह्याची केलेली आहे.अशा महान मातोश्री यांनी १०० वर्ष पूर्ण करुन १०१ वर्षात पदार्पण केलेले आहे. त्यांचा वाढदिवस आगदी सेवाभाव या कार्याने सकल जैन समाज बीड यांनी २३ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधी मध्ये नेत्र तपासणी, मधुमेह रुग्णांची रक्त- लघवी तपासणी,सामान्य रुग्णांची तपासणी मोफत करण्यात येणार आहे.या उपक्रमाचे सर्व आयोजन बीड शहरातील जैन समाजातील दानशुर व्यक्तींच्या मदतीने संपन्न होत आहे.बीड शहरातील बंब नगरी,सावता माळी चौक येथे दि.१८ मे ते २५ मे या दरम्यान अतिरुद्र महायज्ञ व शिव महापुराण कथा सोहळा संपन्न होत आहे.अशा शुभप्रसंगी महाराजांच्या मातोश्रींचा आगळा- वेगळा वाढदिवस जैन समाजाच्या वतीने सर्व सामान्य रुग्णांची वैद्यकीय सेवा करुन अतिशय स्तुत्य उपक्रम आयोजित केला आहे. तरी कथे प्रसंगी उपस्थित सर्व कुटूंबाच्या व्यक्तींनी व शहरातील पंचक्रोशी तील शेतकरी बांधवांनी याचा लाभ घ्यावा.विशेष आता शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत आहे.ज्या विद्यार्थ्यांना डोळ्याला चष्मा आहे किंवा डोळ्याला त्रास आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी नेत्र तपासणी करुन घ्यावी असे आवाहन सकल जैन समाज यांच्या वतीने करण्यात आले आहे.नेत्र तपासणीची वेळ सकाळी १० ते सायं. ६ पर्यंत असणार आहे. मधुमेह रुग्णांची तपासणी सकाळी ७ ते सायं. ७पर्यंत,सामान्य रुग्णांची तपासणी सकाळी १० ते सायं.८ पर्यंत करण्यात येणार आहे.तरी सर्व भाविकांनी या तपासण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनगणना २०२७ साठी नागरिकांनी गणनाकारांना आवश्यक माहिती द्यावी बृहन्मुंबईमहानगरपालिकेचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आता जनगणना २०२७ च्या दुस-या टप्प्यातील 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया सध्या सुरू असून, स्व-गणना (Self Enumeration) पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला एसई आयडी (SE ID) संबंधित गणनाकारांना द्यावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा जनगणना अधिकारी श्रीमती अश्विनी भिडे यांनी केले आहे.

**दिनांक १६ मे ते १४ जून दरम्यान गणनाकारांच्या भेटीत 'एसई आयडी' देणे आवश्यक**

दिनांक १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त गणनाकार नागरिकांच्या घरी भेट देत आहेत. या भेटीदरम्यान स्व-गणनेत सादर केलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणाची प्रक्रिया पार पाडली जात आहे. त्यासाठी नागरिकांनी त्यांचा 'एसई आयडी' गणनाकारांना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. गणनाकारांकडून माहितीची पडताळणी आणि मान्यता झाल्यानंतरच 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया पूर्ण समजली जाणार आहे.

स्व-गणना पोर्टलवर नागरिकांनी सादर केलेली माहिती 'एनक्रिप्टेड' स्वरूपात सुरक्षित सरकारी सर्व्हरवर संग्रहित केली जात आहे. या प्रक्रियेसाठी अत्याधुनिक सायबर सुरक्षा आणि गोपनीयतेच्या उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती श्रीमती भिडे यांनी दिली. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवा किंवा चुकीच्या संकेतस्थळांपासून सावध राहून केवळ अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा. जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक, अचूक आणि सुलभ करण्यासाठी नागरिकांनी गणनाकारांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहनही देखील श्रीमती भिडे यांनी केले आहे.

# मोलगी येथे देशी आंबा व कैरी महोत्सव



दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

सातपुड्यातील शेतकरी बांधवांना वनोपजा पासून होणारे आर्थिक सहाय्य व मातृ वृक्ष संरक्षणाच्या हेतूने अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे देशी आंबा व कैरी महोत्सव पार पडला.

मोलगी परिसर सेवा समिती व रीड्स यांच्या संयुक्त माध्यमातून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सातपुड्यातील शेतकऱ्यांना महू,चारोडी,बांबू हिरडा.व आंबा या.मातृ वृक्षा पासून वर्ष भरात चांगली आर्थिक मदत होते, परंतू ही वनोपजाची देशी झाडे जुनी असून त्यांची संख्या दिवसें दिवस कमी होत असल्याने त्यांचे संरक्षण महत्वाचे आहे म्हणून या आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.सातपुड्यातील देशी आंबा हा खाण्यासाठी लोणचे व आमचूर करण्यासाठी प्रसिद्ध असून त्यांच्या अनेक जाती आहेत.पण काळाच्या ओघात ही झाडे जुनी झाली असून ती कशी टिकवता येथील व त्याची नवीन रोप तयार करून देशी आंबा कसा राखला जाईल यावर चर्चा करण्यात आली.

आंबा महोत्सवात मोलगी परिसरातील शेतकरी बांधव आपल्या कडे असलेल्या देशी कैऱ्या व आंब्या सह मोठ्या संखेने उपस्थित झाले होते.त्यात गोटल्या आंबा,कोलम्या आंबा, नाकुल्या,सीकाला, गुंबाल आंबा, काकड्या आबा,ओगन्या आंबा गुल्या आंबा,रातबोट्या,अशा ३५ प्रकाराच्या आंब्याची नोंद महोत्सवात करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर पाडवी यांनी केले व रीड्सच्या जुई पेठे यांनी देशी आंबा रक्षणाचे महत्त्व शेतकऱ्यां कडून जाणून घेत त्याचे महत्व सांगितले.राकेश खलाने यांनी आंबा रक्षणाच्या हेतूने बालाघाट व भगदरी येथे दहा हजार आंबा व महूची रोप तयार होत असून त्याचा फायदा परिसरासाठी होणार असल्याचे सांगितले. तसेच भीमसिंग वसावे,चंद्रसिंग पाडवी,व दाजला वळवी यांनी शेतकऱ्यांना आपले अनुभव आणि देशी आंब्याचे महत्त्व सांगितले.कार्यक्रमात मीलगी परिसरातील गुलाबसिंग पाडवी,राजेंद्र पाडवी महेंद्र पाडवी,सायसिंग वळवी, गंगेसिंग पाडवी,जितेंद्र पाडवी, सुरूपसिंग वसावे,सिंगा तडवी, वसंत वसावे,आकाश वसावे, भगतसिंग वळवी,लकी वसावे, नितेश वसावे,वंजारी वसावे, शकुंतला वसावे,संगीता वसावे, सुनिल वसावे,आपसिंग वसावे, विरसिंग वळवी,अरुण पाडवी, नटवर वसावे,देवीसिंग तडवी, रमेश वसावे,नारसिंग वसावे, आदी उपस्थित होते.

# ढोलताशांच्या गजरात शेतकरी पुत्राचा भव्य सत्कार मंगेश डाकोरे यांची महसूल सहाय्यकपदी निवड

## कोकण विभाग, नवी मुंबई येथे निवड झाल्याबद्दल धानोरा ग्रामस्थांचा जल्लोष; मिरवणूक, फटाक्यांची आतषबाजी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

पुर्णा तालुक्यातिल धानोरा (मो)शेतकरी कुटुंबातील संघर्षमय परिस्थितीतून शिक्षण घेत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करणारे धानोरा येथील सुपुत्र मंगेश दत्तराव डाकोरे यांची लेखा व कोषागार विभाग, कोकण विभाग नवी मुंबई येथे महसूल सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या निवडीमुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून युवकांसाठी मंगेश डाकोरे प्रेरणास्थान ठरले आहेत.



गावात मंगेश डाकोरे यांच्या स्वागतासाठी ढोलताशांच्या गजरात मुख्य रस्त्याने भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली असून गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जल्लोष साजरा केला. संपूर्ण धानोरा नगरीत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यानंतर आयोजित सत्कार सोहळ्यात परिसरातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक छबुराव पाटील लोखंडे, शिवा संघटनेचे शिवा विद्यार्थी आघाडी लोहा तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे खडकमांजरीकर, युवा उद्योजक व्यंकटराव पाटील लोखंडे, मनोहर पाटील लोखंडे, चरण पाटील कापसे, संजय जोशी सर आदी मान्यवरांच्या हस्ते मंगेश डाकोरे यांचा हार, शाल, श्रीफळ तसेच शिवा संघटनेचा रुमाल टाकुन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीला न घाबरता मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश संपादन करू शकते, असे गौरवोद्गार काढत मंगेश डाकोरे यांच्या कार्याचे कौतुक केले. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना त्यांनी शेतीची जबाबदारी सांभाळून केलेला संघर्ष अनेक युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

गावकऱ्यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात गावातील नागरिक, युवक आणि विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मंगेश डाकोरे यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# आडगाव येथील प्रभाकर भुजंगराव चौकले यांचे दु:खद निधन


## उपचारादरम्यान विष्णुपुरी येथे अखेरचा श्वास;शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

**पुर्णा । प्रतिनिधी**

आडगाव येथील रहिवासी प्रभाकर भुजंगराव चौकले यांचे गुरुवार दिनांक २१ मे २०२६ रोजी उपचारादरम्यान विष्णुपुरी येथील वैद्यकीय रुग्णालयात दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच आडगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दिनांक २२ मे २०२६ रोजी सकाळी १२ वाजता आडगाव येथील त्यांच्या शेतात (मळ्यात) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस नातेवाईक, मित्रपरिवार, ग्रामस्थ तसेच त्यांच्यावर प्रेम करणारे हजारो नागरिक उपस्थित होते.प्रभाकर चौकले यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, सूना, भावजया, नातू, मुली असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे चौकले परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

*शोकाकुल - समस्त चौकले परिवार*



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077